महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,
नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.

दुरध्वनी क्रमांक:-२२६१४००३ संकेतस्थळ : wssd.ws०२.gov.in

---

क्र.कंत्राटी २०२३/प्र.क्र.०४/पापु ०२ दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२४

(Tender Notice)

## दरपत्रकाबाबतच्या सूचना

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या विभागाच्या असलेल्या २ स्टाफ कार करीता २ वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असुन खाजगी पुरवठादारांकडून ११ महिने या कालावधीसाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. पुढे उध्दत करण्यात आलेल्या दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन वाहनचालक पुरविण्याबाबतची दरपत्रके दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ वा. सायं. ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात, उप सचिव (नोंदणी शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई-४००००१. यांचे नावे पाठविण्यात यावीत.

**२. याबाबतच्या अटी व शर्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

I. ११ महिन्यांकरिता या कालावधीकरीता करार करावा लागेल.

II. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

III. निविदाकारांकडून त्यांची दरपत्रके दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ वा. सायं. ५.०० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात उप सचिव (नोंदणी शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय,

मुंबई - ४०० ००१ यांचे नावे पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

**IV.** मोहोरबंद लिफाफ्यावर **"वाहनचालक पुरवठा करणेबाबतचे दरपत्रक"** असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये तांत्रिक निविदा मोहोरबंद करुन (Sealed envelope) दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

**V.** दरपत्रक फॉर्म्सवर, दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

**VI.** प्राप्त दरपत्रक दिनांक १ मार्च,२०२४ रोजी उप सचिव (नोंदणी शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१ येथे दुपारी ०३.३० वाजता उघडण्यात येतील. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

**VII.** दरपत्रकासोबतच्या विहित फॉर्म्ससह, दरपत्रकाचे रु.१००/- (ना-परतावा) शुल्क भरावे लागेल.

**VIII.** निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यांनतर व करार केल्यानंतर मागणी करण्यात येणाऱ्या वाहनचालक पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई येथे तात्काळ व स्वीकृत दरपत्रकानुसार करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

**IX.** वाहनचालकांचा पुरवठा केल्यानंतर दरमहा मुद्रांक पावतीसहीत देयके सादर करावीत. देयकाची रक्कम ECS द्वारे जमा करण्यासाठी बँक खात्याचा सविस्तर तपशिल सादर करणे आवश्यक राहील. परिपूर्ण देयके सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच, प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

**X.** कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

**XI.** पुरवठादार संस्था नोंदणीकृत (उद्योग आधारधारक किंवा उद्योग नोंदणी प्रमाणपत्रधारक) असावा.

**XII.** पुरवठादार संस्थेचा स्वत:चा वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) आवश्यक राहील.

**XIII.** वरील पुर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल व त्यास काळया यादीत (Black List) टाकले जाईल.

**XIV.** वाहनचालक गैरहजर अथवा रजेवर असल्यास पर्यायी वाहनचालक देण्याची जबाबदारी पुरवठादार यांची राहील.

**XV.** शनिवार, रविवार अथवा इतर शासकीय सुट्टीच्या दिवशी आवश्यकतेनुसार वाहनचालक उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार यांची राहील.

**XVI.** यापुर्वी पुरवठादार संस्थेबाबत कोणतीही तक्रार नसावी.

**XVII.** संस्थेचा संपर्क कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्र व ई-मेल इ. तपशिल देण्यात यावा.

**XVIII.** उद्योग, उर्जा व कामगार विभाग अधिसुचना क्र. किवेअ- २०१५/४१८/प्र.क्र.४१०/ कामगार-७ दि.२४.०७.२०१९ नुसार कोणत्याही दुकानातील किंवा व्यापारी आस्थापनेतील कामधंदा (कोणत्याही बँकेतील कामधंदा किंवा अनुसूचित नोंदींपैकी कोणत्याही नोंदीत जो समाविष्ट असेल असा कामधंदा वगळून) या अनुसूचित " उद्योगाचे किमान वेतन दर व दर सहा महिन्यांनी निर्धारित होणाऱ्या विशेष भत्याचे दर दर विचारात घेवून दरपत्रक सादर करावे.

**XIX.** उद्योग उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१३/ कामगार-८ दि. २२.०२.२०१९ नुसार कर्मचाऱ्यास अनुज्ञेय वेतन व भत्ते बाबत, खालील तपशिलाप्रमाणे आपले दर सादर करावे.

| अ.क्र. | **विविध कामगार कायद्यांन्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार अनुज्ञेय वेतन, भत्ते व वजावटी** |
|---|---|
| १. | मूळ वेतन |
| २. | विशेष / महागाई भत्ता |
| ३. | घरभाडे भत्ता |
| ४. | इतर भत्ते |
| ५. | भविष्य निर्वाह निधी (PF) |
| ६. | राज्य कामगार विमा योजना (ESIS) कर्मचारी नुकसान भरपाई (W.C) |
| ७. | व्यावसायिक कर (P.T.) |
| ८. | बोनस |
| ९. | कामगार कल्याण निधी |
| १०. | सुटयांच्या दिवशी केलेले काम |

**XX.** सदर निविदा मसुद्यामध्ये (RFP) वेतन अदा करण्या संबधिच्या अटी व शर्ती, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि. २२.०२.२०१९, **"जोडपत्र अ"** मधील मसुद्यानुसार समाविष्ठ करण्यात याव्यात (**"जोडपत्र अ" सोबत जोडले आहे**).

**XXI.** वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन दि. १३.०७.२०२२ नुसार कंत्राटी कर्मचारी यांचा विमा संबधीत कंत्राटदार यांनी उतरविणे बंधनकारक राहील.

**XXII.** वित्त विभाग शासन निर्णय क्र. अकाभ-२०२२/प्र.क्र.०७/सेवा-६/दि. ०७.०८.२०२३ नुसार वाहनचालकांना अतिकालिक भत्ता अनुज्ञेय असेल.

**XXIII.** वाहनचालकांची कामाची वेळ सकाळी ९:१५ ते संध्याकाळी ६:१५ असुन वाहनचालकाच्या सेवा ९ तासापेक्षा जास्त झाल्यास शासनाच्या रु. १००/- प्रति तास या प्रचलित दराने अतिकालिक भत्ता वाहनचालकास देय होईल.

**XXIV.** मुंबई /बृहन्मुंबई (मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीच्या) बाहेर जावे लागल्यास वाहनचालकास भत्ता तसेच रात्री १०:०० नंतर थांबल्यास जेवण तसेच रात्री ११:०० नंतर थांबल्यास त्याच्या जाण्याच्या प्रवास भत्ताचा दर निविदेत नमूद केल्यानुसार देय राहील.

**XXV.** कंत्राटदारांने एकूण प्रदान केलेले वेतन, सेवाशुल्क व अन्य करांसह देयक खालील कागदपत्रे सोबत जोडून संबंधित विभागास / कार्यालयास सादर करणे आवश्यक असेल :-

१. एकत्रित देयक.

२. नाव व पदनामासह कर्मचाऱ्यांचा वेतन व वैधानिक देण्यांसह तपशील.

३. उपस्थितीबाबतचा तपशील.

४. भविष्य निर्वाह निधी (PF), राज्य कामगार विमा योजना (ESIS)/कर्मचारी नुकसान भरपाई (W.C.) व व्यावसायिक कर (P.T.) आदा केल्याच्या पावत्या.

५. एकत्रीत वेतनचिठ्ठया.

कंत्राटदारामार्फत उपरोक्त यादीप्रमाणे सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/पुरावे तपासून कंत्राटदारास रक्कम अदा करण्यात येईल.

**XXVI.** उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त अन्य आवश्यक अटी व शर्ती, करार करतेवेळी अंतर्भुत करण्याचा अधिकार विभागाकडे असेल.

**XXVII.** उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे तांत्रिक निविदा दरपत्रक मध्ये नमुद असले, तरच निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

(वीरेंद्र वाघमारे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

**गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,**

नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.

**दुरध्वनी क्रमांक:-२२६१४००३** **संकेतस्थळ : wssd.ws०२.gov.in**

---

क्र.कंत्राटी २०२३/प्र.क्र.०४/पापु ०२ दिनांक : १४ फेब्रुवारी, २०२४

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या विभागाच्या असलेल्या २ स्टाफ कार करीता २ वाहनचालकांच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे घेण्याकरीता खाजगी पुरवठादारांकडून ११ महिने या कालावधीसाठी निविदा

**तांत्रिक दरपत्रक**

१. पुरवठादाराचे / संस्थेचे नाव :

२. संपूर्ण पत्ता/कार्यालय :

३. दूरध्वनी (कार्यालय) :

मोबाईल क्र. :

फॅक्स :

ई- मेल :

४. निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक : दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४

५. आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) (प्रत जोडावी) :

६. वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक (प्रमाणपत्राची प्रत जोडणेः अनिवार्य) :

(१) प्रमाणपत्र देणारे कार्यालय :

(II) प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक :

(III) वैधतेची मुदत :

७. व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या :

विविध नोंदण्या दुकाने व संस्था अधिनियम १९४८ :

प्रमाणपत्र देणारे कार्यालय. (प्रत जोडावी) :

प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक........ :

वैधतेची मुदत..... :

८. दरपत्रकाच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती :

दिनांक :

स्थळ : निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का

(सुचना : दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडातोड, गिरवणे (ओव्हर रायटिंग) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकुन तसे करणे आवश्यक असल्यास त्या ठिकाणी पुर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत).